# क्रीडा शिष्यवृत्ती योजना

योजनेचे स्वरुप – राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवरील वैयक्तिक खेळात प्रथम / द्वितीय / तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या कामगार तसेच कामगार पाल्यांना सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते. राज्य/राष्ट्रीय पातळीवर अनेक क्रीडा प्रकार खेळाले जातात. त्यामुळे अर्जदारास एकावेळी एकाच क्रीडा प्रकारासाठी अर्ज करता येईल. अर्जात एकापेक्षा जास्त क्रीडा प्रकारांचा उल्लेख केल्यास अर्ज बाद करण्यात येईल. सदर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेची अट नाही. स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या संघटनेस क्रीडा संचालनालय किंवा प्राधिकृत संस्थेची मान्यता असावी. तसेच सदर क्रीडा प्रकारास देखील क्रीडा संचालनालयाची मान्यता असणे आवश्यक आहे. मान्यताप्राप्त क्रीडा संघटना व मान्यताप्राप्त खेळ याबाबत क्रीडा संचालनालयामार्फत वेळोवेळी घेण्यात आलेले निर्णय लागू राहतील. मंजुर शिष्यवृत्तीची रक्कम पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जाईल. जूनमध्ये साखर कारखाने बंद असतात. अशावेळी हंगामी कामगारांची मागील डिसेंबरची पावती ग्राह्य असेल. त्यात महाराष्ट्र कामगार कल्याण निधी रु.१२/- कपात झाल्याची नोंद असावी.

## शिष्यवृत्तीचे प्रकार –

| अ.क्र. | शिष्यवृत्ती प्रकार | शिष्यवृत्तीचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | राज्यस्तरीय क्रीडा शिष्यवृत्ती | मान्यता प्राप्त संस्था / संघटनेद्वारा आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा.<br>प्रथम क्रमांक - रु.५०००/-<br>द्वितीय क्रमांक - रु.३०००/-<br>तृतीय क्रमांक – रु.२०००/- |
| २. | राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती | मान्यता प्राप्त राज्य / राष्ट्रीय क्रीडा संघटनेद्वारा आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>प्रथम क्रमांक - रु.७०००/-<br>द्वितीय क्रमांक - रु.५०००/-<br>तृतीय क्रमांक – रु.३०००/- |
| ३. | आंतरराष्ट्रीय / विशेष क्रीडा शिष्यवृत्ती | मान्यता प्राप्त राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेद्वारा आयोजित आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>प्रथम / द्वितीय / तृतीय – रु.१५०००/- |

अर्ज करण्याचा कालावधी – माहे जून ते ऑक्टोबर

आवश्यक कागदपत्रे – (सूचना - संकेतस्थळावर अपलोड करावयाची सर्व कागदपत्रे मूळ (ओरिजनल) असावीत. छायांकित प्रती (झेरॉक्स) अपलोड करु नयेत.)

- मान्यताप्राप्त राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेचे प्रमाणपत्र (प्रथम / द्वितीय / तृतीय क्रमांक पटकावल्याबाबत)
- शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्रे (असल्यास)
- खेळाडूचे आधार कार्ड.
- बँकेचा कॅन्सल चेक किंवा बँक पासबुक (अकाऊंट नंबर व आय.एफ.एस.सी. नंबर नमूद असणे आवश्यक) (कोणतेही एक)

- महाराष्ट्र कामगारकल्याणनिधी (MLWF) कपात दर्शवणारी नजीकच्या काळातील (जून किंवा डिसेंबरपैकी) पालक / स्वतः खेळाडूची वेतन पावती **किंवा** वेतन पावती नसल्यास कामगाराचा MLWF भरणा केल्याबाबतचा आस्थापनेचा दाखला. (कोणतेही एक)
- कंपनी बंद पडली असल्यास कंपनी बंद पडल्याबाबतचा सक्षम प्राधिकरणाचा दाखला **किंवा** पालकाचा सेवेत असतांना मृत्यू झाला असल्यास मृत्युचा दाखला जोडावा. सदर दाखले ३ वर्षापर्यंत वैध असून मंडळाच्या योजनांचा लाभ मिळू शकतो.
- कामगार पाल्य असल्यास रेशनकार्ड किंवा ईएसआयसी कार्ड (लागू असल्यास कोणतेही एक)
- अर्जदार दिव्यांग असल्यास सक्षम प्राधिकरणाचा दाखला जोडावा